**नि.दि.दा.क.१८७/२०१६**
**निशाणी क.१८**

MHAH1600007102020

**नियमीत दिवाणी दावा कमांक १८७/२०१६ मधील निशाणी क.१८**

**खालील आदेश**

१. वादी यांनी प्रस्तुत अर्ज दाखल करून विनंती केली आहे की, निशाणी १६ कडे त्यांनी दाव्यात दुरूस्ती करण्याबाबत अर्ज दिला होता जो की, मंजुर करण्यात आला परंतु अनावधानाने सदर दुरूस्ती वेळेत करता आली नाही आणि दुरूस्ती करिता उशिर झाला. तरीही सदर दुरूस्ती करण्यास झालेला उशिर माफ होवून मिळावा. प्रतिवादी यांनी सदर अर्जास विरोध करीत म्हणणे दिले आहे की, वादींनी केलेला उशिर हा हेतुपुरस्पर केलेला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर करावा.

२. अर्ज आणि प्रस्तुत दाव्याचे अवलोकन केले. दावा हा दावा वाटपचा आहे. अर्ज पाहिला. अर्जातील कथने पाहिली त्यावर आलेले म्हणणे पाहिले. वादीचा नि.१६ वरील अर्ज माझ्या पुर्वाधिकारी यांनी मंजुर केलेला आहे. परंतु वादीने केलेला उशिर पाहता त्यावर खर्चाची रक्कम बसविणे गरजेचे आहे. सबब वादीचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश,

**आदेश**

१. अर्ज खर्चाची रक्कम रूपये ५००/— च्या अटीसह मंजुर करण्यात येतो.

दिनांक : २२.०७.२०२२
ठिकाण—अकोले.

( एस. अे.पर्वतकर )
सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर
अकोले.